# प्रेसनोट दि. ०९/०९/२०२३

१८ वा महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळावा-२०२३ चा समारोप समारंभ दि. ०९/०९/२०२३ रोजी १६.३० वाजता राज्य राखीव पोलीस दल, गट क्र. २, पुणे येथील परेड मैदानावर प्रमुख पाहुणे श्री रजनिश सेठ, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांचे उपस्थितीत संपन्न झाला. समारोप समारंभात बँड पथकाद्वारे प्रमुख पाहुण्यांना मानवंदना देण्यात आली. श्री प्रशांत बुरडे, अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि., पुणे यांनी प्रमुख पाहुणे यांचे पुष्पगुच्छ देवुन स्वागत केले. स्पर्धेत सहभागी २४ संघांनी शिस्तबद्ध संचलन करुन प्रमुख पाहुण्यांना मानवंदना दिली. तसेच त्यांना मेळावा व स्पर्धेविषयी माहिती दिली. त्यापुर्वी क्रुट मेमोरियल स्कुल, पुणे या शाळेच्या मुली व मुलांचा वाद्यवृंद कार्यक्रम झाला. त्यांनी अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने लयबद्ध कवायत करून व श्रवणीय वाद्य वाजवून प्रमुख पाहूणे व उपस्थित मान्यवरांचे लक्ष वेधून घेतले. तसेच पोलीस श्वानांनी रोमांचक प्रात्यक्षिके सादर केली.

प्रमुख पाहुण्यांचे हस्ते सर्व स्पर्धांमधील उत्कृष्ट संघांना खालीलप्रमाणे फिरते चषक प्रदान करण्यात आले आहेत.

**बेस्ट टीम परफॉर्मन्स**

| | |
|---|---|
| १. सायंटीफीक एड टू इन्व्हेस्टीगेशन | - पुणे शहर |
| २. पोलीस फोटोग्राफी | - मुंबई शहर |
| ३. पोलीस व्हिडीओग्राफी | - एस.आर.पी.एफ. परिक्षेत्र |
| ४. संगणक सजगता | - कोल्हापुर परिक्षेत्र |
| ५. श्वान स्पर्धा | - नाशिक शहर |
| ६. घातपात विरोधी तपासणी | - महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे |
| ७. कै. अशोक कामटे फिरता चषक | - महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी,पुणे |

**सीसीटीएनएस बेस्ट घटक परफॉर्मन्स**

१) बीड
२) नांदेड
३) रायगड

| | |
|---|---|
| **मेळाव्यातील सर्वोत्कृष्ट तथा सर्वसाधारण विजेता संघ** | **- कोल्हापुर परिक्षेत्र** |
| **मेळाव्यातील सर्वसाधारण उपविजोता संघ** | **- मुंबई शहर** |
| **गुन्हे अन्वेषण विभागाचा शताब्दी फिरता चषक विजेता संघ** | **- कोल्हापुर परिक्षेत्र** |

प्रमुख पाहुणे यांनी स्पर्धेतील विजेत्यांचे अभिनंदन केले. आपल्या भाषणात स्पर्धकांना मार्गदर्शन करुन बदलत्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पोलीसांच्या कर्तव्याबाबतचे महत्व अधोरेखित केले. नव्याने

येवू घातलेल्या कायद्यांच्या बदलांच्या पाश्वभूमीवर पोलीसांना शास्त्रीय साधनांचा उपयोग करणे अनिवार्य असणार आहे त्यामुळे तपासी अंमलदारांनी तपासादरम्यान वैज्ञानिक दृष्टीकोन अंगी बाळगणे गरजेचे आहे यावर माननियांनी भर दिला. विशेषत: AMBIS (Automated Multi-Model Biometric Identification System) प्रणाली अतिशय चांगल्या पद्धतीने राज्यामध्ये कार्यरत आहे. लवकरच आपण CCTNS २.० ही सर्वसमावेशक अशी Crime & Criminal Network Tracking System स्विकारणार आहोत. नवीन तंत्रज्ञान आत्मसात करणे ही काळाची गरज आहे. अगामी ६७ वा अखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळाव्यामध्ये महाराष्ट्र संघास उत्कृष्ट कामगिरी करण्याकरिता शुभेच्छा दिल्या.

सदर कार्यक्रमास,

१. श्री अग्रवाल, सेवानिवृत्त पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य
२. श्री राजेंद्रसिंग, सेवानिवृत्त अपर पोलीस महासंचालक
३. श्री कोरेगावकर, सेवानिवृत्त विशेष पोलीस महानिरीक्षक.
४. श्री रितेश कुमार, पोलीस आयुक्त, गुन्हे, पुणे शहर,
५. श्री. अमिताभ गुप्ता, अपर पोलीस महासंचालक, सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे
६. श्री प्रशांत बुरडे, अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे
७. श्री सुनिल रामानंद, अपर पोलीस महासंचालक, बिनतारी संदेश विभाग, पुणे
८. श्री सुनिल फुलारी, विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र.
९. डॉ. दिलीप पाटील-भुजबळ, विशेष पोलीस महानिरीक्षक, रा.गु.अ.कें., गु.अ.वि., पुणे
१०. श्री संजय येनपुरे, विशेष पोलीस महानिरीक्षक, गुन्हे पुर्व, गु.अ.वि., पुणे
११. श्री अशोक मोराळे, विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, परिक्षेत्र पुणे,
१२. श्री नामदेव चव्हाण, पोलीस उप महानिरीक्षक, आ.गु.शा., गु.अ.वि., पुणे
१३. श्री सारंग आवाड, पोलीस उप महानिरीक्षक, प्रशासन, गु.अ.वि., पुणे
१४. श्री अंकित गोयल, पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण.
१५. श्री. पंकज देशमुख, पोलीस अधिक्षक, आ.गु.शा., गु.अ.वि., पुणे
१६. श्रीमती नम्रता पाटील, समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र. २, पुणे
१७. श्री. दिनेश बारी, पोलीस अधिक्षक, पुणे पथक, गु.अ.वि., पुणे
१८. श्रीमती मनिषा दुबुले, पोलीस अधिक्षक, आ.गु.शा.-२, गु.अ.वि., पुणे
१९. श्रीमती पल्लवी बर्गे पोलीस अधिक्षक, का.व सं., गु.अ.वि., पुणे.

व इतर वरिष्ठ पोलीस अधिकारी उपस्थित होते.

त्याच प्रमाणे सदर सांगता समारंभास पोलीस कुटुंबीय तसेच प्रिंन्ट व इलेक्ट्रॉनिक मिडीयाचे प्रतिनिधी हजर होते.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ. दिलीप पाटील-भुजबळ, विशेष पोलीस महानिरीक्षक, रा.गु.अ.कें., गु.अ.वि. यांनी केले तसेच सुत्रसंचलन श्रीमती सुप्रिया पंधरकर, पोलीस उप निरीक्षक, गुन्हे शाखा, पुणे शहर व श्री सचिन देवडे, पोलीस नाईक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र.२ यांनी केले.


१८ वा महाराष्ट्र राज्य
2
1
3